# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ११४, रूपये:- ५,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | ११७ | १० | राज्यात आरोग्य सेवा मनुष्यबळाचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने महत्वाकांक्षी धोरण निश्चित केल्याने ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सेवा कुशल मनुष्य बळामुळे उपलब्ध होणार आहे. सांगोला व पंढरपूर या ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामधील वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यीका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, परिचर, परिचारीका अशी अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले असल्याने, सांगोला पंढरपूर या ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील आरोग्य सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १२२ | १० | राज्यातील सर्व सामान्य व गोरगरीब जनतेला वैद्यकीय सेवा मिळण्याकरिता राज्य शासनाने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना सुरू करण्यात आलेली आहे. परंतु अनेक सरकारी व खाजगी रुग्णालयात या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे तरी राज्यातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सेवा मिळण्याकरिता या योजनेअंतर्गत सर्व खाजगी व सरकारी रुग्णालयात लाभ मिळण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ११५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (३) | १०३ | १० | उमरेड येथे ग्रामीण रुग्णालयाला नुकताच उपजिल्हा रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे, त्यात ५० खाटांचे रूपांतरित झाले आहे, तसेच त्या बाबतचे अंदाज पत्रके तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे, परंतु सदर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे, त्यामुळे उमरेड येथील उपजिल्हा रुग्णालय येथील प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात शासनाने तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १०४ | १० | उमरेड येथे ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा सेंटर मंजूर करण्यात आहे, परंतु सदर ट्रॉमा केयर सेंटर मधील सुमारे विविध १५ पदे भरण्यात यावी यासाठीचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे, परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे, त्यामुळे उमरेड येथील ट्रॉमा सेंटर येथील प्रलंबित असलेल्या पदे भरण्याच्या प्रस्तावास व शासनाने तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १०५ | १० | उमरेड तालुक्यातील बेला येथिल प्राथमिक आरोग्य केंद्र ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय रूपांतरित झाले आहे, परंतु सदर इमारत बांधण्यासाठी इमारत बांधकाम निधी साठी त्या बाबतचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे, परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे, त्यामुळे उमरेड तालुक्यातील बेला येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांचा प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात शासनाने तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १०६ | १० | भिवापूर येथे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त आहे त्यात ३० खाटांचा मंजूर आहे, तसेच सदर ठिकाणी २० खाटा ट्रॉमा सेंटर आहे परंतु तेथील कर्मचारी राहत असलेली इमारत अत्यंत जुनी असून ती जीर्ण झाली आहे, त्यामुळे त्या ठिकाणी वास्तव्यास असलेले कर्मचारी व त्यांची कुटुंबीय यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, त्यामुळे सध्याची जुनी इमारत/घरे पाडून त्याच ठिकाणी नवीन कर्मचारी वसाहत स्थापन करावी यासाठीचा अंदाज पत्रके तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहे, परंतु सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्याने प्रलंबित आहे, त्यामुळे भिवापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील प्रलंबित असलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकात शासनाने तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ११९, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (७) | १०८ | १०० | मुंबईतील परळ येथील महात्मागांधी स्मारक रुग्णालयाची इमारत राज्य कामगार विमा मंडळ अंतर्गत बांधण्यात आलेली असणे, सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी कर्मचा-यांची पदे भरण्यात आलेली असणे, तथापी सदर रुग्णालयामध्ये दैनंदिन ५-१० रुग्णच उपचारासाठी येत असणे, त्यामुळे रुग्णालयाची वास्तू वापरा अभावी पडून असणे, परिणामी सदर रुग्णालयावर अनावश्यक खर्च होणे, सदर रुग्णालय शासनाच्या किंवा मुंबई महानगरपालिकेच्या मार्फत चालविण्यात आल्यास शासनाच्या/महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयावरील ताण कमी होण्यास मदत होणार असणे, त्यामुळे सदर रुग्णालय राज्य शासनाने ताब्यात घेऊन राज्य शासन किंवा मुंबई महानगरपालिकेमार्फत रुग्णालयाची सेवा देण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (८) | ११९ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड येथील मांगूळ झनक येथील ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १२० | १० | वाशिम जिल्हयातील शिरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे रुपांतर श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (१०) | ११८ | १० | पश्चिम नागपूर येथे जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी राज्य शासनाने 2015 मध्ये मंजुरी देणे व त्यासाठी निधीही मंजूर केला असणे, परंतू १० वर्षे पूर्ण होऊनही या रुग्णालयाचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नसणे, तसेच आवश्यक वैद्यकीय तज्ज्ञ,साधनसामग्री,रुग्णवाहिका,शववाहिका,शवागार,कॅन्टीन आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली नसणे, त्याचप्रमाणे जलजोडण्या आणि अग्निशमन विभागाच्या मंजुऱ्या प्रलंबित असणे, त्यामुळे स्थानिक रुग्णांना खाजगी रुग्णालयांत दाखल व्हावे लागत असल्याने गोरगरीब जनतेला आर्थिक हानी सोसावी लागत असून जिल्हा सामान्य रुग्णालय त्वरीत सुरु करण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन या रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२१, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (११) | १०९ | १०० | यवतमाळ जिल्ह्यातील वणी मतदार संघात ३५० पेक्षा जास्त खेडे जुळले असून वणी शहर व ग्रामीण भागातील लोकसंख्या अंदाजे ३ लक्ष पेक्षा जास्त असणे, वणी उपजिल्हा रुग्णालय सद्य:स्थित ५० खाट क्षमतेचे असल्याने येथे रुग्णांना सेवा देणे कठीण होत होणे, तसेच रुग्णांना उपचाराअभावी इतर जिल्हात जावे लागत जागणे, वणी मतदार संघात कोळसा खाणी व दगडाच्या खाणी असून या खाणीमध्ये इतर जिल्हातील कामगार असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता वणी उपजिल्हा रुग्णालयाच्या खाटांची (बेड) क्षमता वाढविणे गरजेचे असणे, त्यामुळे वणी उपजिल्हा रुग्णालयाची खाटांची क्षमता वाढवून ५० वरुन १०० करण्यात यावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई